सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.

**भिवंडी ते नाशिक (राष्ट्रीय महामार्ग क्र.०३ च्या बाजूने) भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरिता ०.६२२९ हे. वनजमिन वळती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१२१६/प्र.क्र.३२२/फ-१०**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक १७/१०/२०१६

<u>वाचा:-</u>

१) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.११-९/९८/एफसी, दि.०८/०४/२००९.
२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र.एफएलडी-१००९/प्र.क्र.६५७/फ-१०, दि.०४/१२/२००९.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे यांचे पत्र क्र.कक्ष-१०/वसं/प्र.क्र.५३/१५-१६/जा.१०३०/१५-१६, दिनांक १५/१२/२०१५.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/एनसी/II/आयडी.१२४१८/(५८)/१८६४/१५-१६, दिनांक ०८/०१/२०१६.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/आयडी.१२४१८/(५८)/११४०/१६-१७, दिनांक २१/०९/२०१६.

<u>आदेश :-</u>

ज्याअर्थी, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांनी, मे.रिलायन्स जीओ इन्फोकॉम लिमिटेड, मेकर्स चेंबर, नरिमन पॉईंट, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला, भिवंडी ते नाशिक (राष्ट्रीय महामार्ग क्र.०३ च्या बाजूने) भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरिता ०.६२२९ हे. वनजमिन वळती करण्याबाबतचा प्रस्ताव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना उपरोक्त अ.क्र.३ येथील पत्रानुसार सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारच्या दिनांक ०८/०४/२००९ च्या सूचना विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने दिनांक ०४/१२/२००९ च्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना रस्त्याच्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरिता अधिकार प्रदान केले आहेत. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी अ.क्र.४ येथील पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांनी अ.क्र.३ अन्वये सादर केलेल्या भिवंडी ते नाशिक (राष्ट्रीय महामार्ग क्र.०३ च्या बाजूने) भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरिता ०.६२२९ हे. वनक्षेत्र वळती करणाच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता दिली आहे. सदर मान्यता ही दिनांक ०८/०१/२०१६ रोजीच्या पत्रात नमूद अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे,

आणि ज्याअर्थी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये अटी पूर्तता अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केला आहे,

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच मे.रिलायन्स जीओ इन्फोकॉम लिमिटेड, मेकर्स चेंबर, नरिमन पॉईंट, मुंबई यांना भिवंडी ते नाशिक (राष्ट्रीय महामार्ग क्र.०३ च्या बाजूने) भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरिता खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे संदर्भ क्र.४ येथील पत्रानुसार सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली एकूण ०.६२२९ हेक्टर वनजमिन या प्रस्तावासाठी वळती करण्यात यावी. हे वळतीकरण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या दिनांक ०८/०१/२०१६ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे.

१) वर नमूद केलेल्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तत्वत: मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा), धुळे हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर दिनांक ०८/०१/२०१६ रोजीच्या पत्रातील अटी आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

३) उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non compliance) संबंधित मुख्य वनसंरक्षक / उप वनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, पश्चिम क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

**अनुसूची**

| गावाचे नांव | तालुका व जिल्हा | वैधानिक दर्जा | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| वाशिंद, खातिवली भाग १, खातिवली भाग २, वेहलोली टी अघई, आसनगांव, काळंभे, चेरपोली, कांबरे, पुनधे, अटगांव, साखरोळी, कानविंदे, कळमगाव, वरसकोल, शिरोळ भाग १, शिरोळ भाग २ | तालुका शहापूर, जिल्हा ठाणे | राखीव वन | ०.०९३० |
| | | संरक्षित वन | ०.३६५४ |
| | | अंतिमत: संपादित वन | ०.००६५ |
| | | पुन:स्थापित खाजगी वन | ०.१५८० |
| | | **एकूण क्षेत्र** | **०.६२२९** |

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१७१६२६०६७११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3a3acfdb19b03628a399a9a8c3aed13feb739d7b8bfdb181d6ec461d4505a7e, cn=Virendra R Tiwari
Date: 2016.10.17 16:29:43 +05'30'

**(वीरेन्द्र तिवारी)**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत:**

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), नागपूर

**प्रत :**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर
८. मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे
९. जिल्हाधिकारी, ठाणे
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे

११. उप वनसंरक्षक, शहापूर
१२.मे.रिलायन्स जीओ इन्फोकॉम लिमिटेड, मेकर्स चेंबर, IV, २२२, नरिमन पॉईंट, मुंबई
१३.निवडनस्ती (फ-१०)

२. जिल्हाधिकारी, ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे व उप वनसंरक्षक, शहापूर यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. मे.रिलायन्स जीओ इन्फोकॉम लिमिटेड (पूर्वीचे नांव इन्फोटेल ब्रॉडबँड सर्व्हिस लि.), नरिमन पॉईंट, मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे व उप वनसंरक्षक, शहापूर यांना सादर करण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

**Diversion of 0.6229 ha. forest land for laying underground Optical Fibre Cable from Bhiwandi to Nashik (Along NH-03).**

**Government of Maharashtra**

**Revenue and Forest Department**

**Government Resolution No.: FLD-1216/CR-322/F-10**

Mantralaya, Mumbai 400032

Date: 17/10/2016

**<u>Read –</u>**

1) Ministry of Environment & Forests, Government of India, letter No.11-9/98/FC, Dated 08/04/2009
2) Government of Maharashtra, Revenue and Forest Department letter No.FLD-1009/CR-657/F-10, Dated 04/12/2009
3) Chief Conservator of Forests (T.), Thane letter No.Desk-10/VS/C.R.53/15-16/1030/15-16, dated 15/12/2015
4) Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur's letter No. Desk -17/NC/II/I.D.12418/(58)/1864/15-16, dated 08/01/2016
5) Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur's letter No. Desk -17/Nocel/2/I.D.12418/(58)/1140/16-17, dated 21/09/2016

**<u>Order :-</u>**

Whereas, the Chief Conservator of Forests (T.), Thane, vide its letter referred at sr. no.3 above, has submitted a proposal to the Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur, which has been received from M/s Reliance JIO Infocomm Limited, 3rd Floor, Makers Chamber, IV, 222, Nariman Point, Mumbai-21 for diversion of 0.6229 ha. for laying underground Optical Fibre Cable from Bhiwandi to Nashik (Along NH-03) in Thane district;

Whereas, pursuant to the directives issued by the Government of India vide their letter dated 08/04/2009 and subsequent directives issued by Government of Maharashtra's letter Dated 04/12/2009 empowering Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur to grant permission for laying down of underground Optical Fibre Cable within the existing diverted road width, the Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur has granted in-principle approval for diversion of 0.6229 ha. for laying underground Optical Fibre Cable from Bhiwandi to Nashik (Along NH-03) in Thane district, vide its letter referred at Sr.No.4 above to the proposal submitted by Chief Conservator of Forests (T.), Thane vide his letter referred at Sr.No-3. The said approval is subject to fulfillment of certain conditions by the User Agency mentioned in its letter dated 08/01/2016;

AND whereas, the Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur vide letter referred at sr. no. 5 above has submitted compliance of those conditions to the State Government,

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 0.6229 ha. of forest land more specifically described in the proposal submitted vide letter mentioned at sr. no.-4 here in above from Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be diverted to the User Agency, i. e. M/s Reliance JIO Infocomm Limited, 3rd Floor, Makas Chamber, Makers Chamber, IV, 222, Nariman Point, Mumbai-21 for laying underground Optical Fibre Cable from Bhiwandi to Nashik (Along NH-03). The diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the letters dated 08/01/2016 of Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur. This approval for diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle approval letter of Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur, referred above. The Chief Conservator of Forests (Territorial), Thane shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency. CCF will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
2. Non-compliance of any of the conditions mentioned in Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur letter dated 08/01/2016, in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Chief Conservator of Forests / Deputy Conservator of Forests shall report through the State Government to Additional Principal Chief Conservator of Forests, Government of India, Ministry of Environment, Forests & Climate Change, Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

**SCHEDULE**

| Village | Tal. & Dist. | Legal Status | Area (in ha.) |
|---|---|---|---|
| Washind, Khativali P1, Khativali P2, Vehloli T. Aghai, Asangaon, Kalambhe, Cherpoli, Kambare, Pundhe, Atgaon, Sakharoli, Kanvinde, Kalamgaon, Varaskol, Shirol Part 1, Shirol Part2 | Tal.Shahapur, Dist. Thane | Reserved Forest | 0.0930 |
| | | Protected Forest | 0.3654 |
| | | Finally Acquired Forest | 0.0065 |
| | | Restored Private Forest | 0.1580 |
| | | **Total area in Ha.** | **0.6229** |

This Government Order of Maharashtra Government is available on its website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201610171626067119. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3a3acfdb19b03628a399a9a8c3aed13feb739d7b8bfdb181d6ec461d4505a7e, cn=Virendra R Tiwari
Date: 2016.10.17 16:30:06 +05'30'

**(Virendra Tiwari)**

Chief Conservator of Forests (Mantralaya)

**Copy to:**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, WCZ, Nagpur

**Copy to:**

1. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur
2. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur
3. Principal Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai
4. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.

7. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
8. Chief Conservator of Forests (Territorial), Thane.
9. Collector, Thane
10. Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane
11. Deputy Conservator of Forests, Shahapur.
12. M/s Reliance JIO Infocomm Limited, 3rd Floor, Makers Chamber, IV, 222, Nariman Point, Mumbai-21.
13. Select File, Desk F-10.

2. Collector, Thane, Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane and Deputy Conservator of Forests, Shahapur are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self government bodies for the information of general public.

3. M/s Reliance JIO Infocomm Limited, 3rd Floor, Makers Chamber, Nariman Point, Mumbai-21 is hereby directed that they should publish the entire order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No.etc. and along with the conditions and safe guards imposed by the Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language and submit the copies of newspapers to Chief Conservator of Forests (Territorial), Thane & Deputy Conservator of Forests, Shahapur.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.